## ।। प्रकरण तिसरे ।।

## प्रकरण तिसरे

### " प्रतिक्षा " या कादंबरीचा आशय :

भारत-पाक युद्ध दि. 20 एप्रिल 1965 रोजी सुरू झाले. यापूर्वी 62 पॅराट्रुपर्स उतरल्या होत्या. त्यापैकी 61 ट्रूपस् कैद करण्यात आल्या व एक जखमी झाला . त्याचा बेत फसला. पुन्हा पाकचे पॅराट्रूपस् दिल्ली मेरीटच्या दरम्यान उतरण्यात आले. त्याचा शोध चालू होता. किती पॅराट्रूपस् उतरल्याची बातमी नाही. पण ते तिघे जण उतरले हरीपूरच्या पोलीस चौकीवर. त्यातील एकाचा पाय दुखवल्यामुळे त्याला उठता येईना. दुसरे दोघेही यापूर्वीच पकडले व त्यांचे साहित्य पोलीसांनी हस्तगत केले होते.

पाक सैनिकांनी आपल्या सहकार्यांना सोडविण्यासाठी पोलीस ठाण्यावर हल्ला केला. तेथील दोन शिपायांना गोळया घालून ठार केले व पोलीस चौकी पेटवून दिली. त्यामुळे दिल्लीतील रेडिओ स्टेशन, पॉवर हाऊस , विमानतळ, आजुबाजूच्या दारूगोळयाचे कारखाने इत्यादी महत्वाच्या ठिकाणी बंदोबस्त वाढवला होता.

कर्नल नायरांनी पॅराट्रूपस्चा शोध घेण्यासाठी माझी (निवेदकाची) नेमणूक केली. त्यानंतर त्याने सिव्हील ड्रेसवर काम करण्यास सुरूवात केली. मी तेथून मिलीटरी मेडीकर हॉस्पीटल मध्ये गेलो. डॉ. बत्रा यांची भेट घेतली. त्यांची परवानगी घेऊन पाक सैनिकांना भेटलो. त्यावेळी तेथे तिघेजण होते. त्यापैकी मेजर हुसेन यांना एका स्वतंत्र खोलीत ठेवले होते. शिवाय बाहेरील बाजूने पहारा ठेवला होता. तरीसुद्धा भिंत लहान असल्यामुळे भिंतीवरून जाणे अवघड नव्हते. डॉ. बत्रा यांनी माझी आग-याच्या 'इन्किलाब ' वृत्तपत्राचे वार्ताहर- 'श्रीयुत माथूर ' अशी ओळख करून दिली. व ते निघून गेले.

माझी व मेजर हुसेन यांची चर्चा झाली. मी तेथून बाहेर आलो व डॉ. बत्रांची भेट घेतली. त्यांनी मला सांगितले की, पॅराट्रूपस् बरोबर काही साहित्य, भारतीय चलनातील वीस हजार रूपये व

दारूगोळा इत्यादी पकडले. हा दारूगोळा भारताचे पार्लमेंट हाऊस उडवून दयायला पुरेसा होता.

माझ्या मनामध्ये पॅराट्रूपस् बद्दल अनेक विचार येत होते. मी हरिपूर येथे पोहोचलो. मी चालत असता पाठीमागून कोणीतरी पाठीवर थाप मारली. " काय माथूर, कुठं पत्ता आहे ? ' मी मागे वळून पाहिले त्यावेळी तो म्हणाला, ' मला माफ करा, हं, तुम्ही मागून हुबेहुब माथूर सारखे दिसता । ' त्यावेळी मला माझी डॉ. बत्रांनी मेजर हुसेनशी ओळख करून देताना माथूर हे खोटं नाव सांगीतले. ती व्यक्ती म्हणाली, जाऊ दे, आपण चहा घ्यायला जाऊ, त्या व्यक्तीने माझी बारकाईने विचारपूस केली. त्यावेळी मी त्याला सर्व खोटं सांगीतले. त्याक्षणी ती व्यक्ती म्हणाला, ' पाखरं उडाली । ' तेंव्हा माझा विश्वास बसेना. त्यांनी सांगीतले की सात पॅराट्रूपस् पोलीसांनी पकडल्या. पकडली गेलेली एकूण दहा जण होते. त्यावेळी तुम्ही कोण ? असे विचारले असता त्यांनी नाव सांगीतले, ' मी यश चौधरी ' दिल्लीच्या सी.आय.डी. खात्यात काम करतो. तुमची खेप उगीचच झाली. ।.

माझी व यश चौधरीची पॅराट्रूपस् बद्दल चर्चा सुरू झाली. त्यावेळी त्याने मला ' सर ' करून टाकले. एका व्यापा-याची गाडी सकाळी 9 वाजता चोरीला गेली व ती सकाळी ।। वाजता मिरठला सापडल्याची बातमी आहे. याचा मी विचार करीत होतो. यशने ती मला जागा दाखविली. त्याविषयी चर्चा चालू झाली आणि पॅराट्रूपस् उतरल्या जातील काय ? आम्ही दोघेजण चालत राहीलो काही अंतर गेल्यावर यशने आपल्या जीवनाचा इतिहास सांगितला असता तेवढयात गाडीचा आवाज ऐकू आला. त्या गाडीतून सहा माणसे उतरली त्यातील एकजण आमच्या दिशेने आला. तेवढयात काही मिनीटातच विमानाचा आवाज ऐकू आला. विमानाचे दिवे बंद होते. त्याने खिशातून बाटली काढली व ती बोळयावर ओतली. त्यावेळी आम्हाला पेट्रोल सारखा वास आला त्याने दुस-या बाजूस ज्योत पेटवली अशा रितीने त्याने इंग्रजीत 'टी' अक्षर तयार केले. आमच्या डोक्यावरून गेलेले विमान बोळयाच्या प्रकाशाच्या दिशेने येऊ लागले. पाहता पाहता मागच्या बाजूचा दरवाजा उघडला गेला. विमानातून दोन आकृती शेतात उतरताना मी पाहिल्या.

प्रयत्न केला. तेवढयात गाडी चालू झाली. यशने भरदार वेगाने गाडी घेऊन गेला. मी ओरडलो, ' यश एवढा मुर्खपणा करू नकोस ' हे माझे शब्द कोणाला ऐकू गेले नसावेत तेवढयात धडाधडा आवाज ऐकू आला इतक्यात मेजर हूसेन मला दिसले. मी त्यांच्या अंगावर धाऊन गेलो. त्यांच्या दंडाला हिसका दिला सर्व ताकद एकवटून ढोसा दिला. आम्ही दोघे मागे फेकले गेलो. दुखविलेल्या पायांनी त्याला दगा दिला. स्वतःला सावरण्यापुर्वीच खाली यमुनेच्या कोरडया पात्रात पडलो आणि त्याचबरोबर कान बधीर करणारा स्फोट कडाडला. सारा पुल हादरून गेला प्रकाश पडला. भुसनळयासारखी यशची गाडी पेटल्याची मी पाहिली. त्यांच्याशेजारी पोलीस चौकी, तिथल्या पोलीसांच्या चिंधडया उडाल्या आणि पुलावर लोकांचा एकच कल्लोळ उडाला.

एकाएकी माझ्या पोटात कळ आली एकदम प्राण कंठाशी आले. डोळयाला अंधेरी आली. आणि पहाता - पहाता मी पाहिले रक्ताने माखलेला प्रतापचा चाकू माझ्या पोटात घुसला.

मी काही कल्पनेच्या विश्वात आलो. मी डोळे उघडले. मी दिल्ली मिलटरी हॉस्पीटलच्या खोलीत आहे. सुभेदार मेजर रशिदला ही ब्राईट वाटले. मी शुद्धीवर आलो तेंव्हा मेजर हुसेनांना हलता येत नव्हते. त्याच्या कमरेभोवती प्लॅस्टर केले होते. रशीदला माझ्यासमोर आणून उभा केले. मी एक टक पहात पहात राहिलो. बँडज मधून दिसणारा चेहरा मी पाहिला. माझ्या पोटात सुरी खुपसलेला रशिद वेगळाच होता. त्याला पाहून मला त्याची दया आली.

मी कसा दिसत असेन वृत्तपत्रात आलेले फोटो मला सिस्टर दाखवित होती. माझ्यावर रकानेच्या रकाने भरुन मजकूर येत होता. आणि मी थोडफार यातना सहन करण्या इतका बरा असेन त्यावेळी सिस्टर मला दाखवित असे. कर्नल नायर माझ्याजवळ आले डोक्यावर हात ठेवून विचारले " आता कसं वाटते ?" येवढयात मला फिरून पोटात कळ आली मी बिछान्यावर तडफडू लागलो. सिस्टर पुढे आली. त्यांनी मला मर्फियाचे इंजेक्शन दिले. मी ज्यावेळी शुद्धीवर येत असेन आणि फिरून कळ येत असे त्यावेळी मला तेच इंजेक्शत देत असत. शुद्धीवर आल्यावर मी काहीतरी गुंगीत पडलेला असे. मला माणसे ओळखताना उशीर लागे.

मला व यशला पाहताच शेतक-यांनी हात वर केले. त्यांच्याविषयी मनात विचार आले त्याने पोलिसांना खबर दिली असेल का ? लेप्टनंट युसुफने प्रश्न विचारला , " यांचे लोक बाहेर आहेत वाटतं ?" युसुफ चांगलाच चमकला. त्यांनी पाठीमागे पाहिले आणि विचारले ,' सर ' तुम्ही त्यांना पाहिलंत की नाही. तो शेतक-यासारखा माणूस त्यांच्यापैकी एक असावा असे वाटते.

माझ्या शेजारी यश बसला होता. तो बोलत नव्हता. त्याच्यात फरक पडला होता. माझ्या मनात कल्पने विषयी विचार आले. माझ्या वडीलांचे पत्र आले होते. कल्पनेचे लग्न ठरले आहे. मुलगा मोठया हुद्यावर आहे. पुढील आठवडयात लग्न आहे. इत्यादी विचार येत होते.

उजव्या बाजूला मेजर हुसेन सुचना देत होते. गावाबाहेरील रींगरोडला गाडी जाऊ लागली. माझ्या गळयाला युसुफने पिस्तुलची नळी लावली होती. फोनवरील संभाषण खरे असेल असे वाटत होते. तेवढयात गाडी जमुना ब्रिजजवळ घेण्यास सांगितले. पुलावर कडेकोट बंदोबस्त होता. प्रत्येक गाडी तपासून सोडत होते. आमची गाडी शेवटी येऊन उभी राहिली.

माझ्या मनात अनेक विचार येत होते. माझ्या ओळखीचे पोलीस असेल किंवा कर्नल नायरांनी पोलीसांना सांगीतले असेल त्यांना ओळखलं तर अटक केली जाईल व प्रश्न सुटत जाईल. किंवा गाडीचे दार उघडून पळून जायचे किंवा बंदुकीचा आवाज करावयाचा म्हणजे पोलीसांच्या लक्षात येईल इत्यादी विचार येत होत. मेजर हुसेनने गाडी पुढे नेण्यास सांगितले. मी हॉर्न वाजवीत गाडी पुढे काढली. मी पुलाच्या प्रवेशापर्यंत गाडी पुढे आणली. तेवढयात त्वरेने पोलीसपुढे आला आणि विचारले मागे काय आहे. मागून उत्तर आले पोलीसांची गाडी आहे. कुणीतरी आतून यशाची आयडेंटीकार्ड पोलीसांच्या पुढं धरलं. त्यांनी बॅटरीच्या मंद प्रकाशात ते पाहिले. गाडी पुढे जाण्यास परवानगी दिली. पुलाच्या मध्यभागी गेल्यावर मेजर हुसेनने गाडी थांबविण्यास सांगीतले. माझ्या मनात विचार येत होते. मागे पाहिले तर गाडी रिकामी आहे. अंधाराचा फायदा घेऊन मेजर, सुभेदार, लेप्टनंट लोकांच्या गर्दीत मिळालेले मी पाहिले. माझ्या मनात पुल उडवून देण्याविषयीची कल्पना आली. मी यशवर ओरडलो, 'गाडीच्या डिक्समध्ये बॉम्ब आहेत पुल उडवून दयायला पुरेसे आहेत. मी गाडीच्या डिक्सजवळ गेला व उघडण्याचा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

माझ्या डोक्यात मारला माझी शुद्ध हरपली.

तो लेप्टनंट मला शुद्धीवर आणण्यासाठी प्रयत्न करतो. टेबला पलीकडे मेजर हुसेन बसले होते. त्यांच्या पाठीमागे सुभेदार मेजर यांनी माझ्या खिशातील सर्व साहित्य टेबलावर काढले होते. अजूनही यशाच्या तोंडतून रक्त येत होते. शेवटी हुसेन म्हणाले मि. माथूर मला तुम्हाला त्रास देण्याची मुळीच इच्छा नाही. मला व यशला त्यांनी सांगितले.

मेजर हुसेन म्हणाले, माझे भारतातच शिक्षण झाले. माझे नातेवाईक येथे आहेत. चिडून मी पाकीस्तानमध्ये भरती झालो. मेजर हुसेन म्हणाले, "तुम्हाला त्रास देण्याची माझी इच्छा नाही " असे कबूल केले. रशिदने मला दंडाला हिसका देऊन दार बंद केले. दुस-या खोलीत यश होता. मी विचार करीत होतो. आम्हाला जिवंत का ठेवले आहे. आमचा उपयोग कशासाठी करणार आहेत याचा विचार मी करीत आहे. कर्नल नायर काय करीत असतील ? शेटजींची गाडी चोरीला गेल्याबाबत , शेतक-याने खबर दिली असेल का ? इत्यादी विचार येत होते. सुटकेसाठी काही मार्ग आहेत का ? सिनेमातील कल्पना वेगळी. माझ्यामनात कल्पनेच्या लग्नाविषयी विचार येऊ लागला. मी तिच्या वडीलांची भेट घेतली. त्यांना मी कल्पना पसंत आहे असे सांगितले. त्यावेळी त्यांनी उत्तर दिले. माझी एकुलती एक मुलगी. सैन्यातील अधिकारी नवरा नको. कारण माझ्या बहिणीचे यजमान कर्नल आहेत. माझ्या बहिणीचे जीवन मुलीच्या वाटयाला येऊ नये असे मला वाटते. माझ्या मनात मी कल्पनेशिवाय जगू शकत नाही. मी कल्पनेला पत्र पाठवले . तुझ्या वडिलांना लग्नाचा विरोध आहे. आपण दोघे पळून जाऊन लग्न करूया. परंतु कल्पनेच्या उत्तराची मी वाट पहात होतो. पण उत्तर आले नाही. हे पत्र पोहोचले की नाही याचा विचार करीत होतो. तेवढयात फोनची ब्रेल वाजली. लेप्टनंट युसुफने विचारले थोडेसे शब्द ऐकू आले. संरक्षण मंत्री आणि जनरल चौधरी जाणार आहेत बरोबर आठ वाजता ब्रिजवर येवढे बोलून थॅंक्स म्हणून फोन बंद झाला.

मला व यशला घेऊन मेजर हुसेन, लेप्टनंट, जे.सी.ओ. इत्यादी गाडीतून बाहेर पडलो.

जवळ त्या बंगल्याविषयी चौकशी केली. त्यांच्याकडून काही माहिती मिळाली. त्या बंगल्यात दर्यावान असतो. मालक कधी - कधी येतात. आम्ही बंगल्याच्या पाठीमागे गेलो व बंगल्याची पहाणी केली. परंतू छपरा शिवाय काही दिसत नाही.

मी कल्पनेचा विचार करीत होतो. ती मोठी झाली असेल तिच्याविषयी माझ्या मनात विचार येऊ लागला. मी झाडावरून भिंतीवर चढलो. यशकडून पिस्तून घेतले. प्रतापचा चाकू घेतला. पिस्तूल भरलेले आहे की नाही याची खात्री करून घेतली. मी यशला सांगितली, कर्नल नायरांना फोन करून सांगा पाक सैनिक येथे आहेत. यश म्हणाला, ' सर मी येऊ का ?' कारण मला काळजी वाटते. मी यशचा निरोप घेऊन आत गेलो. मी तारेतून आत जाऊन कंपाऊडवरून उडी घेतली.

मी आत गेलो तेंव्हा माझ्या मनामध्ये गाडी विषयी अनेक विचार येऊ लागले. बंगल्यातील आतील निरिक्षण केले जुन्या पद्धतीने बांधलेला होता. मी सावधगीरीने आत जात होतो छपरावर उंच अेरिएल काढलेली होती. शिवाय ट्रान्समीटर ठेऊन हव्या त्या बातम्या घेण्यासाठी योजना असावी यासाठी बराच पैसा खर्च केला असावा. मी आत गेलो तेंव्हा मेजर हुसेन हे तरूण अधिकारी काहीतरी गोष्टी समजावून सांगत होते. तो अधिकारी लेप्टनंट असावा . मला यशने म्हटल्या प्रमाणे खरोखरच मी मोठा धोका पत्करला होता. मी प्रथम पाहिले यश आणि त्या पाठीमागून पिस्तून मागे धरून प्रश्नार्थक मुद्रेने जे.सी.ओ. कडे पाहिले त्याने यशची झडती घेतली. त्यामध्ये ओळखपत्र, मला देऊन उरलेल्या पिस्तूलच्या गोळया इत्यादी होते. त्याला खुर्चीवर बांधून टाकले. मेजर हुसेन अनेक प्रश्न त्याला विचारीत होते. तुझी पिस्तूल कोठे आहे , तुझ्याबरोबरचा जोडीदार कोठे आहे ? त्याशिवाय त्याला मारहाण केली. त्याच्या तोंडातून रक्त आहे. एवढे करून सुद्धा त्याने काहीच उत्तर दिले नाही. त्यावेळी मला त्यांचा फार राग आला.

मी खिडकीतून आत शिरलो. वीस फूट उडी मारली. आवाज झाला नाही. मी उभा राहिलो. मी हॉलच्या दुस-या टोकास टेलीफोन जवळ हळू-हळू गेलो. पलीकडे ते यशला प्रश्न विचारण्यात गुंतले होते. मी फोन केला त्यावेळी माझ्या अंगाला घाम सुटला. एकदा दोनदा रिंग वाजली. त्यातून आवाज आला कर्नल नायर तेवढयात लेप्टनंट दहा हातावर पिस्तूलचे टोक धरून उभा होता. तो म्हणाला फोन बंद करा शेवटी मी बोललो पाक सैनिकांचा पत्ता लागला आहे तेवढयात सर्व ताकतीने त्याने पिस्तूलचा लोखंडी दस्त

लागली होती. त्यामुळे माझ्या डोक्यात कळ चढली होती. मी व यश यशच्या घरी गेलो. माझ्या अंत:करणात फिरुन कळ आली . त्यावेळी कल्पनेची आठवणं आली. यशच्या घरी गेलो. त्यावेळी त्याचे वडील, एक मुन्ना, एक नोकर होता. यशच्या बायकोने गरम पाणी दिले. पाण्याने हातपाय व जखम धुतली. यशच्या बायकोने माझ्या दंडाला पट्टी बांधली. यशने माझे कपडे धुतले. पाहुणचार झाला. यशच्या मुन्नाने यशला पुन्हा येताना मला शाळेत जायला हत्ती आणा, लाकडाचा नको, खरोखरचा आणा, मी हत्तीवर बसेन व शाळेत जाईन, इत्यादीची चर्चा झाली. नंतर यश व मी उठलो. यशच्या बायकोने भाऊजी पुन्हा कधी याल असे विचारले . मी पुन्हा येईन असे सांगीतले. आम्ही यशच्या घरातून बाहेर पडलो.

आम्ही दोघेजण टॅक्सीत बसलो. ताजा पेपर घेतला त्यात बातमी होती. आज पहाटे काही अज्ञात इसमांनी हत्या करून कैद असणा-या पाक अधिका-याला पळवून नेले. डयुटीवर असणा-या डॉ.बत्रा व एक पहारेकरी यांना जागच्या जागी ठार केले. पोलीस अज्ञात इसमांचा तपास करीत आहे. माझ्या मनामध्ये विचार येत होता. नायरांना हे सर्व कळायला हवं होते. मी व यश याबाबत विचार करीत होतो. आम्ही गाडी एका ठिकाणी थांबविली. त्याठिकाणी शेटजींचे घर होते. आम्ही गुरूद्वार जवळ शेटजींच्या घराजवळ गेलो. यशने ती गाडी ओळखली. आम्ही दोघे टॅक्सीजवळ गेलो. परंतु ड्रायव्हर म्हणाला गाडी कोठे जाणार नाही. प्रतापला (ड्रायव्हरला ) घेऊन मी व यश गाडी घेऊन गेलो. काही अंतर गेल्यावर त्याला दमदाटी करून सुद्धा कबुल झाला नाही शेवटी यशनी मला पिस्तूल दिले. त्याच्याबद्दलची मला दया उरली नव्हती प्रतापने हे पाहुन आम्हाला सर्व माहिती सांगीतली. आम्ही प्रतापला सोडून निघालो.

प्रतापने आम्हाला पत्ता दिला होता. त्याप्रमाणे हरिप्रसाद वर्माच्या बंगल्याची चौकशी केली. बंगला रस्ता सोडून आत होता. गाडी एका बाजुला लाऊन मी व यश चालत त्या बंगल्याकडे गेलो. तो बंगला जुन्या पद्धतीचा होता. त्या बंगलयाच्या सर्व बाजूंनी दहा फुट उंचीची भिंत होती. आम्ही बंगल्यामध्ये दृष्टीक्षेप टाकला. गाडी बंगल्याच्या पार्कींगमध्ये नव्हती. आम्ही रस्ता सोडून शेतात शिरलो. शेतक-यांच्या

ज्या ठिकाणी दोन पॅराट्रूपस् उतरल्या गेल्या त्या पूर्व नियोजित असाव्यात तरीसुद्धा पोलिसांनी त्यांच्यावर गोळीबार केला. गोळबार करुन सुद्धा पाक सैन्य त्यांच्या हातावर तुरी देऊन आमच्या जवळून गेले. गोळीबार चालू असताना यशने त्या गाडीचा नंबर टिपून पेट्रोलच्या टाकीचा नट ढिला केला होता. त्यामुळे गाडी जवळपास बंद पडेल असा तर्क मी आणि यशने केला. काही अंतर गेल्यावर एक गाडी आम्हाला दिसली त्या गाडीत सरदारजीच झोपलेला होता. त्याला आम्ही खाली ढकलून गाडी घेऊन गेलो.

काही अंतर गेल्यावर एक तरूण गाडीच्या आडवा आला. यशने ब्रेक लावल्याबरोबर तिघेजण एकापाठोपाठ एक असे गाडीत आले. त्यांच्याविषयी मी तर्क केला, एक लेप्टंनंट असावा, दुसरा मेजर असावा, तिस-याच्या हातात अमेरिकन बनावटीची 32 नंबरची पिस्तून माझ्याकडे रोखत त्याने विचारले, " गाडी कुठे जाणार आहे ।" दिल्लीला जाणार आहे असे मी सांगून टाकले. आम्हांला दिल्लीला पोहोचायचे आहे. आणि फुकट नाही हे, पैसे देऊ काही अंतर गेल्यावर त्यांनी गाडी थांबवावयास सांगीतली . कासिम व एक इसम त्या पाठोपाठ उतरला. त्याने एक मोठी पेटी मागच्या डिकीत ठेवली . माझ्या मनामध्ये अनेक विचार येत होते. तेवढयात लेप्टनंट खाली उतरला. त्याने कोठेतरी फोन केला. नंतर गाडी निघाली. काही अंतर गेल्यावर पोलीसांनी गाडीची चौकशी केली. त्या अगोदर कासिमने सूचना दिल्या होत्या त्याप्रमाणे आम्ही मेकॅनिकल आहे असे सांगितले. पुन्हा गाडी काही अंतर गेल्यावर पुढुन एक गाडी आली. एक दोन वेळा दिवे विझवीले- लावले अशा खुणा केल्या. माझ्या मनामध्ये पेट्रोंल पंपावर केलेल्या फोन चा अर्थ असावा. गाडी थांबवण्यास सांगीतले. त्यावेळी ते तिघेजण खाली उतरले. कासिमने बंदुक दाखवून मगाशी दिलेले पैसे परत घेतले. मी कल्पनेच्या विचारात गुंग होतो. दिवे बंद झाले होते. यशची बंदूक कडाडली होती. कासिम खाली पडला असावा. पलिकडूनही गोळयांचा वर्षाव झाला. कासिमच्या अंगाची चाळण झाली व ती गाडी वेगाने निघुन गेली. कासिमला कल्पनासुद्धा नव्हती की आपले जोडीदार आपल्याला गोळया घातलीत. खरे म्हणजे पाक सरकारने मरणोत्तर मानचक्र दयावे असे मला वाटते. त्यातील एक गोळी माझ्या खांदयाला

मला विरचक्र मिळाल्याचे समजले . सामना मी जिंकलो होतो खरा पण तो जिंकला तेंव्हा यश अपयशाची अवस्था संपली होती. ' मला कमांडन बघून गेले. ' कर्नल नायर व इन्स्पेक्टर मला रोज भेटत असतं. कर्नल नायरानी मागे कामाचा डोंगर उभा केला आहे . त्यातून वेळ काढून ते मला भेटायला येत असत. माझ्या पोटात तीन चार जखमा झाल्या, तज्ञ डॉ कडून ऑपरेशन यशस्वी झाले नाही. तो माणूस आणखी किती दिवस जगणार आहे ? आज 8 सप्टें ची 23 तारीख आहे पेपर हाता धरत सिस्टर म्हणाल्या हे पहा ," पाकने युद्धबंदी स्विकारली युद्ध संपले ' युद्ध कुणी जिंकल, हार कुणाची आणि जित कुणाची ? कुणी जिंकला असो, कुणी हारला असो आज माझ्या रशिदच्या मेजर हुसेनच्या अवस्थेत फारसा फरक नाही. कदाचित हे ही कारण असेल की , युद्धाच्या भट्टीत माणसाच्या अंगातील उत्तम गुण शुद्ध सुवर्णासारखे तावून, सुलाखून निघतात. तसे या घाईत माणासाच्या माणूसकीचा होम होतो. माझ्या पोटात कळ येते. सिस्टरला मार्फियाचे इंजेक्शन दयायला मी सांगीतले तेंव्हा यशची तरूण विधवा पत्नी तिच्या छोटया मुन्नासह मला पहावयास आली होती. ती व्हरांडयात उभी होती.

आयुष्यात ही एक ' प्रतिक्षा' आहे । वेगवेगळया गोष्टींची । भावपूर्ण तरूण वयात कल्पनेच्या पत्रांची प्रतिक्षा होती । नंतर खांदयावर एक चकचकता तारा मिळविण्याची, तो मिळविल्यावर कल्पनेच्या माझ्या विवाहाची । आणी आता.... । आत्ताही एक प्रतिक्षा चालू आहे.... गेले चार दिवस चालू आहे. ती पण आता पुरे.. यशची विधवा पत्नी व मुन्ना या खोलीत येण्यापुर्वीची.

पुन्हा पोटात असहाय्य कळ येते हे पाहून सिस्टर पुन्हा इंजेक्शन देते. मी पुन्हा कल्पनेच्या विश्वात जातो. काही क्षणात पॅराट्रूपस् उघडली जाते. मी हवेत तरंगू लागतो. सृष्टी जादूनगरीसारखी दिसू लागते.. ह्या विश्वाचा स्वामी मी आहे.

**भारत - पाक युद्धावरील कादंबरी :**

प्रभाकर पेंढारकरांनी 'प्रतिक्षा' भारत-पाक युद्धावरील वर्णन करणारी कादंबरी रेखाटलेली आहे. युद्धाच्यावेळी पाक सैन्य भारतात पॅराट्रूपर्स कसे उतरतात. त्या घटना कशा घडत जातात ते वास्तव युद्ध जसे घडत गेले ते शब्दांनी रेखाटण्याचे कौशल्य त्यांनी 'प्रतिक्षा' या कादंबरीमध्ये केले आहे.

लेखकांनी कादंबरीत भारत-पाक युद्धाचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे. पाकिस्तानने पठाणकोटच्या आसपास 62 पॅराट्रूपर्स काही दिवसांपूर्वी उतरवले होते हे मी ऐकले होते. त्यापैकी 61 पॅराट्रूपर्स तेथेच ताबडतोब पकडण्यात आले. एक झटापटीत जखमी झाला आणि मरण पावला होता.[1]

ह्या पॅराट्रूपर्सना पठाणकोटचा विमानतळ ताब्यात घेणे, तेथल्या विमानांचा नाश करणे आणि रडार यंत्रण उद्ध्वस्त करणे ही कामगिरी देण्यात आली होती. ती पूर्ण केली असती तर पाक विमान येऊन त्यांना परत घेऊन गेले असते. पण त्यांचा बेत फसला. 62 पैकी 61 ट्रूपर्स कैदी झाले. आजूबाजूच्या जाट आणि शीख लोकांनी त्यांना हार्नेस बाहेरही येऊ दिले नाही. तेवढयात त्यांच्या मदतीला भारतीय सैन्यही आले।[1]

ज्याप्रमाणे निवेदकाला ईतर बातम्या येत होत्या त्याप्रमाणेच पाक पॅराट्रूपर्स अधिका-यांला ॲडमिट केल्याची बातमी आली. निवेदक त्यांना भेटायला गेले त्यावेळी डॉ. बत्रा हे त्यांच्यावर औषधोपचार करीत होते. त्यावेळी डॉ. बत्रांनी निवेदकाची माथूर म्हणून ओळख करून दिली. त्यावेळी डॉक्टरांनी पाक पॅराट्रूपर्स अधिका-यांच्याजवळ काही दारूगोळा व भारतीय चलनातील 20,000/- रूपये सापडल्याचे सांगितले.[2]

निवेदकाची नियुक्ती मेजर नायरांनी पॅराट्रूपर्स शोधण्यासाठी केली होती. त्यावेळी पॅराट्रूपर्सचा शोध घेत असताना रस्त्यामध्ये यश चौधरी भेटले. त्यांनी ज्याठिकाणी पॅराट्रूपर्स उतरल्या हे सांगत असताना आपल्या जीवनाचा इतिहास सांगितला.

भारतीय सैन्य पॅराट्रूपर्सचा शोध घेऊन पाक सैनिकांना शोधून काढून त्यांनी ठरविलेल्या यमुना ब्रीज हा महत्वाचा मार्ग उडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. त्यावेळी यशने स्वतःचा जीव धोक्यात घालून स्फोट होणारी गाडी घेऊन गेला. पूल संपताच त्या गाडीचा स्फोट झाला.

ही कादंबरी सुख आणि दुःख यांचा दुहेरी मिलाप घडविणारी कादंबरी प्रभाकर पेंढारकरांनी लिहीलेली आहे. त्यामध्ये त्यांनी निसर्गाचे वर्णन आणलेले आहे. त्यामध्ये त्यांनी निवेदकाची प्रिय असणारी कल्पना आणलेली आहे. त्याचप्रमाणे भारत-पाक युद्ध वास्तवात ज्याप्रमाणे घडत गेले त्याप्रमाणे शब्दातुन कादंबरीत आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मराठी साहित्यातील आशयाचे क्षितिज विस्तारणारे अनुभव :**

मराठी साहित्यातील आशय म्हणजे त्या कादंबरीचा मुख्य गाभा होय. त्याशिवाय कादंबरी आकार धारण करू शकत नाही. त्या आशयाचे विश्लेषण करण्याचे कौशल्य त्या लेखकाला द्यावे लागते. ती त्याच्या बुद्धीनुसार तो त्याला आशयाच्या अनुषंगाने आकार देऊन ती कथा किंवा कादंबरी पुर्ण करण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो.

प्रभाकर पेंढारकरांनी 'प्रतिक्षा' या कादंबरीतुन पॅराट्रूपर्स कसे उतरले जाते या विषयाचे विवेचन येथे केले आहे. परंतु या आशयामध्ये निवेदकाचा मित्र भेटतो. तो त्याच्या जीवनाचा इतिहास सांगतो. नंतर निवेदक व त्याचा मित्र यश हे दोघे मिळून यशाच्या घरी जातात. यावेळी मित्राचे वडील, त्याचा मुलगा, त्याची बायको घरात गेल्यानंतरचे केलेले विवेचन. त्याप्रमाणे निवेदकाची प्रिय असणारी कल्पना, तिच्या प्रेमाविषयीच्या आठवणी, तिच्याबरोबर लग्न करण्यासाठी तिच्या वडिलांची गाठ घेऊन त्यांच्याबरोबर लग्नाविषयी केलेली चर्चा. परंतु शेवटी त्यांच्याकडून आलेला नकार इ.चे विवेचन. त्याप्रमाणे निवेदकाच्या वडिलांकडून आलेले कल्पनेच्या लग्नाविषयीचे पत्र, शेवटी पॅराट्रूपर्स भारतात पाक सैनिक कसे उतरतात? त्यांच्या केलेल्या हालचाली, त्यांनी ठरविल्याप्रमाणे यमुना ब्रीज उडवण्याचा प्रयत्न. त्याबरोबर निवेदक व त्याचा मित्र यश यांनी केलेले प्रयत्न. शेवटी यशाचा मृत्यु. निवेदक व मेजर हुसेन यांची झालेली चर्चा. शेवटी मेजर हुसेन व निवेदक यमुना नदीच्या कोरडया पात्रात पडतात इ. चे विवेचन या आशयामध्ये लेखकाने केलेले आहे.

**शत्रुत्वापलीकडे माणुसकी शोधण्याचा प्रयत्न :**

प्रभाकर पेंढारकरांनी 'प्रतिक्षा' या कादंबरीच्या आशयामध्ये वावरताना भारत-पाक युद्धाच्या प्रसंगी सुद्धा पाक सैन्य व भारतीय सैन्य या दोन व्यक्तीत त्यांच्या परिस्थितीतून त्यांच्यामध्ये माणुसकीच्या भावना जागृत होतात. त्या जागृत झाल्यावर भारतीय अधिकारी माथूर व यश यांना शिक्षा केल्या जात नाहीत. अशारितीने शत्रुत्व असूनसुद्धा माणुसकी जपण्याचा प्रयत्न येथे केलेला दिसून येतो.

यश आपल्या ज़ीवनाचा इतिहास निवेदकाला सांगतो. तो म्हणतो," 1947 साली दंगल सुरू

झाली. तेव्हा मी सहा - सात वर्षांचा होतो. आमचे किराणा मालाचे दुकान होते. त्यावेळी बरेचसे मुसलमान आले. त्यांनी माल उधार घेऊन पैसे दिले नाहीत. त्यामुळे दुकान बंद केले. त्याचवेळी अधूनमधून गोळीबार होत होता. त्यावेळी मी घरीच होतो. त्याचवेळी दंगल सुरू झाली. गोपाळ नावाच्या एका वृद्ध समाजसेवकास आमच्या घरासमोर भोकसले. तो धडपडत धडपडत आमच्या घराजवळ आला व दारावर थाप मारली. पाणी.. पाणी म्हणून शब्द मला ऐकू आले. मी पाणी घेऊन गेलो. माझ्या गालावर एक चपराकी मारली. शेवटी पाणी देऊ शकलो नाही. याठिकाणी पाणी देण्याची यशची माणुसकी दिसून येते.

यशला पाकिस्तान सैनिकांनी पकडले त्यावेळी त्याचा छळ केला. त्याचक्षणी निवेदक स्वतः वरून डोळयांनी पहात होता. तेव्हा त्याला आठवले आपण सुद्धा प्रतापचा असाच छळ केला होता. त्यावेळी छळ करणा-या पाक अधिका-याला यशची दया आली नाही. मात्र निवेदकाच्या मनामध्ये प्रतापविषयी करूणा आली. ते माणुसकीचे विचार निवेदकाच्या मनामध्ये आलेले दिसून येतात. निवेदकाला व यशला पाकिस्तान अधिका-यांनी पकडले व त्यांना शिक्षा केली. शेवटी त्यांना कंटाळून मेजर हुसेन म्हणाले तुम्हाला त्रास देणेची आमची मुळीच इच्छा नाही. मी सुद्धा भारतीयच आहे. मी दिल्लीतच रहातो. माझे नातेवाईक येथे आहेत. परंतु मी त्यांना भेटू शकत नाही. मी रागारागाने पाकिस्तानी सैन्यात भरती झालो. अशारितीने पाक अधिका-याची शिक्षा देण्याची माणूसकी जागृत होते.

अशारितीने प्रभाकर पेंढारकरांनी मराठी साहित्यात भारत-पाक युद्धाचे वर्णन करून शत्रुत्वापलीकडे माणुसकी शोधण्याचा माणुस त्यांनी वास्तवात सत्य आहे हे लेखनशैलीतून दाखवुन दिले आहे.

## xx संदर्भ टिपा xx

### xx प्रकरण तिसरे xx

1. प्रतिज्ञा प्रभाकर पेंढारकर. विश्वकर्मा साहित्यालय, आवृत्ती पहिली 11 फेब्रुवारी 1969 पृष्ठ 11.

2. प्रतिक्षा प्रभाकर पेंढारकर. विश्वकर्मा साहित्यालय, आवृत्ती पहिली 11 फेब्रुवारी 1969 पृष्ठ 21.